## दिनांक ११.१.२०२४ रोजीचा प्राप्त प्रशासकीय विषय

**(प्रशासकीय विषय)**

विषय क्रमांक १५१ – नागरीकांना पुरविण्यात येणाऱ्या सर्व सेवा महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या प्रभावी व नविन्यपुर्ण उपक्रमाची अमरावती महानगरपालिकेत अधिसूचित करण्या बाबतचा प्रशासकीय विषय मा.प्रशासक यांची मंजुरी मिळणे बाबत.

ठराव क्रमांक १५१ - महाराष्ट्र लोक सेवा हक्क अधिनियम, २०१५ मध्ये अधिसुचित एकुण ५७ सेवा अमरावती महानगरपालिका स्तरावरुन विविध विभाग व झोन कार्यालयाकडुन पुरविण्यात येतात. सदर सेवा निश्चित कालमर्यादेत पुरविण्याबाबत सेवानिहाय पदनिर्देशीत अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहेत. अमरावती शहरातील नागरीकांनी लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ मधील अधिसुचित सेवा पैकी ज्या सेवा संदर्भात पदनिर्देशीत अधिकाऱ्याकडे अर्ज सादर केला आहे. त्या पदनिर्देशीत अधिकाऱ्यांनी सेवा पुरविण्याच्या कालमर्यादेत नागरीकांना आवश्यक माहिती / प्रत उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने निर्देशीत केले आहे. त्यानुषंगाने नागरीकांना पुरविण्यात येणाऱ्या सर्व सेवा महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या प्रभावी व नविन्यपुर्ण उपक्रमाची अमरावती महानगरपालिकेत अधिसूचित करण्याबाबतचा प्रशासकीय विषय मा.प्रशासक यांच्या मंजुरी करीता ठेवण्यात आला आहे.

उपरोक्त प्रशासकीय विषय सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर करण्यात आला आहे. परंतु सध्यस्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीय विषयास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव मंजूर व कायम

**स्वा./-**
**नगर सचिव,**
**महानगरपालिका, अमरावती**

**स्वा./-**
**प्रशासक,**
**महानगरपालिका, अमरावती**

नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती.